मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.com » पुणे, पिंपरी–चिंचवड » रविवार, दि. 14 जुलै 2024 | पान- 1

# ‘हुकमी एक्का’ पुन्हा मैदानात?

## दगाफटका झालाच... तर पक्ष संघटनेत होणार बदल : आगामी विधानसभा निवडणुकीसाठी ‘प्लॅन- बी’तयार

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड शहरात एकेकाळी बलाढ्य असलेल्या राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीला २०१४ पासून उतरती कळा लागली. महाविकास आघाडीच्या सत्ता प्रयोगानंतर २०२३ मध्ये पक्षात मोठी फूट पडली. अजित पवार महायुतीसोबत गेले. लोकसभा निवडणुकीनंतर राजकीय वातावरण बदलले. या लाटेवर स्वार होण्यासाठी ‘दादा’ गटातील शहराध्यक्ष अजित गव्हाणेंसह ४० जण ‘साहेब’ गटामध्ये प्रवेश करणार आहेत, असा दावा केला जातो. त्यामुळे अजित पवारांची राष्ट्रवादीचा नवा चेहरा कोण? याबाबत राजकीय वर्तुळात चर्चा रंगली आहे.

लोकसभा निवडणुकीत शरद पवार गटाने राज्यात १० जागा लढवल्या. त्यापैकी ८ जागांवर विजय मिळवला. बारामती आणि शिरुरसारख्या बालेकिल्ला असलेल्या मतदार संघांमध्ये ‘दादा’गट पिछाडीवर राहीला. जनमत ‘साहेबांसोबत’ आहे, असा नॅरेटिव्ह सेट झाल्यामुळे आता आगामी विधानसभा निवडणुकीसाठी ‘दादा’ गटातील इच्छुकांची अस्वस्थता वाढली.

दरम्यान, राष्ट्रवादी शरद पवार पक्षाकडून येत्या २० जुलैरोजी पिंपरी-चिंचवडमध्ये ‘विजय संकल्प मेळावा’ घेण्यात येणार आहे. त्यासाठी शहराध्यक्ष तुषार कामठे आणि सहकारी यांनी मोठी तयारी केली आहे. या मेळाव्यात अजित पवार गटातील मोठा गट प्रवेश करणार, असे बोलले जाते. मग, अजित पवार राष्ट्रवादीचा नवीन संघटनात्मक प्रमुख कोण? याबाबत चर्चा रंगली आहे.



### पिंपरी-चिंचवडमध्ये राज्यपाल नियुक्त आमदार?

» भारतीय जनता पार्टीने चिंचवड आणि भोसरीमध्ये आमदार असताना पुन्हा निष्ठावंतांना संधी या गणितानुसार, उमा खापरे आणि अमित गोरखे यांना विधान परिषदेवर संधी दिली. त्याच धर्तीवर पिंपरी-चिंचवडचा बालेकिल्ला मजबूत ठेवण्यासाठी उपमुख्यमंत्री अजित पवार नवा डाव टाकण्याच्या तयारीत आहेत. महायुतीने विधानसभा व विधान परिषदेतील संख्याबळ मजबूत करण्यासाठी सर्व रिक्त जागा भरण्याची तयारी केली आहे. राज्यापाल नियुक्त आमदारांच्या नियुक्तीचे प्रकरण गेल्या ३ वर्षांपासून प्रलंबित आहे. आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सदर १२ जागा भरण्यासाठी महायुतीची मोर्चेबांधणी आहे. यापैकी किमान ३ जागा राष्ट्रवादी अजित पवार गटाला मिळाणार आहे. त्यातील १ जागा पिंपरी-चिंचवडमधून भरली जाईल, त्यासाठी योगेश बहल यांचे नाव आघाडीवर आहे. त्यासाठी राष्ट्रवादीतील संभाव्य बंडखोरी आणि घसरण रोखण्याचे आव्हान बहल यांना पेलावे लागणार आहे.

### पिंपरी विधानसभा राजकीय हालचालींचा केंद्रबिंदू....

» पिंपरी विधानसभा मतदार संघाच्या राजकीय हालचाली भोसरी आणि चिंचवडच्या तुलनेत दुय्यम, असा समज आहे. पण, सध्या परिस्थिती बदललेली आहे. अनुसूचित जातींसाठी राखीव असलेला हा मतदार संघ २०२६ मध्ये खुला प्रवर्गासाठी उपलब्ध होण्याची शक्यता आहे. कारण, मतदार संघ पुन:रचना होणार आहे. योगेश बहल आणि मंगला कदम यांना क्षमता असतानाही आमदार होता आले नाही. कारण, हे दोन्ही नेते सर्वसाधारण प्रवर्गातून आहेत. दुसरीकडे, महाविकास आघाडी आणि राष्ट्रवादी शरद पवार पक्षाकडून शहराध्यक्ष तुषार कामठे नेतृत्व करतात आणि माजी नगरसेविका सुलक्षणा शिलवंत-धर या पिंपरीतून महाविकास आघाडीच्या उमेदवारीसाठी प्रमुख दावेदार आहेत. कामठे आणि शिलवंत हे दोन्ही नेते योगेश बहल यांचे कट्टर विरोधक आहेत. त्यांच्यासह शरद पवार गटाला रोखण्यासाठी आणि विद्यमान आमदार आण्णा बनसोडे यांना ‘सेफ’ करण्यासाठी राष्ट्रवादी अजित पवार गटाकडून योगेश बहल यांना ताकद दिली जावू शकते. असे असले तरी, येत्या २० जुलैपर्यंत होणाऱ्या राजकीय घडामोडींवर अनेक गणिते अवलंबून राहतील, असे चित्र आहे.

# मेट्रोकडून पिंपरीत पे अ‍ॅण्ड पार्कचे काम सुरू

## मेट्रोच्या वाहनतळाअभावी वाहनचालकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे, वाहनाच्या सुरक्षेबाबत दंडाच्या पावतीचीही धास्ती

**पिंपरी | प्रतिनिधी**

मेट्रोच्या वाहनतळाअभावी वाहनचालकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. वाहनाच्या सुरक्षेबाबत दंडाच्या पावतीचीही धास्ती आहे. वर्ष उलटूनही मेट्रोकडून स्टेशन परिसरात वाहनतळ (पार्किंग) सुरू करण्यात आलेले नाहीत. त्यामुळे प्रवासी मेट्रो स्टेशनखालील पदपथ, रस्त्यांवर वाहने लावून प्रवास करत आहेत. दरम्यान, नागरिकांच्या तक्रारी, वाहनचालकांना बसलेला भुर्दंड यामुळे प्रवासी मेट्रोवर नाराज होते. यामुळे अखेर मेट्रोला जाग आली असून, मोरवाडी चौकाजवळ पहिल्या टप्प्याचे पार्किंग सुरू केले आहे.

पिंपरी, मोरवाडी येथील चौकानजीक असलेल्या मेट्रोच्या मोकळ्या जागेवर पार्किंग विकसित करण्यास सुरुवात केली आहे. तेथे पे अ‍ॅण्ड पार्कची सुविधा असणार आहे. वाहनचालकांना पार्किंगची सुविधा व्हावी यासाठी ‘सीविक मिरर’ने ती बाजू सविस्तर मांडली होती. यामुळे प्रशासनाला उशिरा का होईना जाग आली. पिंपरी-चिंचवड महापालिकेने अनेक जागा महामेट्रोस दिल्या आहेत. मात्र, मेट्रो सुरू होऊन अनेक महिने लोटले तरी, अद्याप मेट्रोला पार्किंग सुरू करता आलेले नाही. मेट्रोने प्रवास करणारे नागरिक, कर्मचारी व विद्यार्थी मेट्रो स्टेशनखाली वाहने पार्क करून प्रवास करतात. मेट्रो स्टेशनखाली अपुरी जागा असल्याने प्रवासी थेट पदपथ व रस्त्यावर वाहने लावून जातात.



### जुलैमध्ये कारवाईचा वेग वाढला

» परवानगी नसतानाही विद्यार्थी वाहतूक करणाऱ्या बस, व्हॅन आढळून आले आहेत. त्यामुळे अशांवर कारवाई सुरू आहे. एप्रिल ते जून महिन्यांत आरटीओच्या पथकाने संशयित अशी ९३ वाहने तपासली आहेत. त्यापैकी ३४ वाहने दोषी आढळून आलेली आहेत. त्यानुसार दंडापोटी त्यांच्याकडून ४ लाख ७३ हजार वसूल केले. जुलै महिन्यात ७२ वाहने तपासली असून, २४ वाहनांवर कारवाई केली आहे. त्यात ३ लाख ५ हजार दंड ठोठावला.

### प्रवाशांच्या रोषानंतर मेट्रोची कार्यवाही

» पिंपरी चिंचवड शहरातील लाखो प्रवासी पीसीएमसी ( मोरवाडी) मेट्रो स्थानक येथून प्रवास करतात. प्रवासी वाढल्याने मेट्रोचा गल्ला वाढला. मात्र, पायाभूत सुविधा देण्यास मेट्रोकडून चालढकल होऊ लागली. पार्किंग उपलब्ध नसल्याने वाहने रस्त्यावर येऊ लागली. परिणामी, वाहनचालकांना हजारोचा दंडाची पावती प्राप्त झाली आहे. या विरोधात नागरिकांनी संताप व्यक्त केला असून, मेट्रोकडे तक्रारी केल्या. अखेर प्रवाशांच्या या नाराजीनंतर पार्किंगची कार्यवाही सुरू केली.

# बोगस शाळांच्या विद्यार्थ्यांच्या प्रवेशाचं काय?

## आता विद्येचं माहेरघर असलेलं पुणेच बोगस शाळांची फॅक्ट्री बनल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे

**पुणे | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवडसह जिल्ह्यातील ४९ अनधिकृत शाळांची यादी शिक्षण विभागाने जाहीर केल्यानंतर त्यातील विद्यार्थ्यांच्या समायोजनाचा प्रश्न ऐरणीवर; एक महिन्यापूर्वी प्रवेश प्रक्रिया संपूनही समस्या कायम असल्याने पालक, सामाजिक कार्यकर्ते यांनी व्यक्त केला संताप

पुणे: आपल्या पाल्यांना इंग्रजी माध्यमाच्या शाळांमध्ये प्रवेश मिळावा, यासाठी पालकांची धडपड सुरू असते. त्यातच पालक लाखो रुपये शुल्क भरून आपल्या मुलांना खासगी शाळांमध्ये प्रवेश मिळवून देत असतात. मात्र आता विद्येचं माहेरघर असलेलं पुणेच बोगस शाळांची फॅक्ट्री बनल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. संपूर्ण प्रवेश प्रक्रिया संपल्यानंतर एक महिन्यानंतर आता या बोगस शाळांमधील हजारो विद्यार्थ्यांचे प्रवेश कुठल्या शाळेत करायचे, याबाबत कुठलीही स्पष्टता नाही. त्यामुळे पालक, पालक संघटनेचे प्रतिनिधी आणि सामाजिक कार्यकर्ते यांनी संताप व्यक्त केला असून या मुलांचे प्रवेश कसे, कुठे आणि कधी करायचे, असा सवाल त्यांनी उपस्थित केला आहे.

शाळा सुरू होऊन महिना होत आला असताना खडबडून जागे झालेल्या शिक्षण विभागाने अनधिकृत शाळांची यादी जाहीर केली. पुणे, पिंपरीसह जिल्ह्यात तब्बल ४९ अनधिकृत शाळा असल्याचे समोर आले आहे. दरम्यान, या शाळांमध्ये जर मुलांनी प्रवेश घेतला असेल तर त्यांच्या पुढील भवितव्याची जबाबदारी कोण घेणार, हा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

एप्रिल-मे महिन्यामध्ये अनधिकृत शाळांची यादी जाहीर करणे आवश्यक आहे. जेणेकरून पालकांची फसवणूक होणार नाही अन् विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होणार नाही. मात्र आता शैक्षणिक वर्ष सुरू झाल्यानंतर अनधिकृत शाळांची यादी जाहीर करायचा नवा पायंडा शिक्षण विभागाने पाडला आहे. यंदा शाळा सुरू होऊन महिना होत आला तरी अनधिकृत शाळांची यादी जाहीर केली नव्हती. ज्यावेळी हा विषय चर्चेचा होऊ लागला त्यानंतर खडबडून जागे झालेल्या शिक्षण विभागाने अनधिकृत शाळांची यादी जाहीर केली. मात्र यात मोठा घोळ आहे. यादी असणाऱ्या अनेक शाळांचे वर्ग सुरू असल्याचे समोर आले आहे. त्यामुळे ही यादी जाहीर करून शिक्षण विभागाने पालकांच्या डोक्याला ताप करून ठेवल्याची चर्चा आहे. यादीमध्ये अशी काही नावे आहेत की त्या शाळांची नावे वर्षानुवर्षे येत आहेत. ही संख्या गतवर्षीच्या तुलनेत यावेळी कमी आहे; पण उरलेल्या शाळांकडे परवानगी आहे का, असा सवाल उपस्थित होत आहे.



### अनधिकृत शाळांच्या यादीत घोळ

» शिक्षण विभागाने अनधिकृत शाळांची यादी जाहीर केली आहे. त्यामध्ये दौंड शहरातील शालिमार चौकात किडजी स्कूलच अस्तित्वात नसल्याचे समोर आले आहे, तर दुसरीकडे जिजाऊ एज्युकेशन सोसायटी अभंग शिशू विकास कासुर्डी ही शाळा बंद होऊन साधारण दोन-तीन वर्षे झाली आहेत. या शाळेच्या संस्थाचालकांनी दंडही भरला आहे. ही अशाळा आता बंद असतानादेखील या यादीत तिचे नाव आले आहे. एवढेच नाही तर काही शाळा स्थलांतरित झाल्या असल्या तरी त्यांचा जुनाच पत्ता नमूद आहे. त्यामुळे केंद्रप्रमुखांनी अनधिकृत शाळा शोधल्या की जुन्याच यादीतील काही नावे नव्या यादीत दिली, असाही सवाल विचारला जात आहे. शिक्षण विभागाने जी यादी जाहीर केली त्यामध्ये सुरुवातीला ५० शाळा म्हटले आहे. वास्तविक, ४९ शाळा अनधिकृत असल्याचे यादी पाहिल्यानंतर निदर्शनास येते. त्यामुळे नक्की शाळा किती आहेत, हाही एक प्रश्नच आहे.

> अनधिकृत शाळांची यादी जाहीर करण्यास वेळ लागला आहे. परंतु, पालकांनी घाबरण्याचे कारण नाही. कोणत्याही विद्यार्थ्याचे शैक्षणिक नुकसान होणार नाही. यादीमध्ये अस्तित्वात नसणाऱ्या तसेच स्थलांतर झालेल्या शाळांची नावे आली असतील तर पुन्हा एकदा यादी तपासून तसेच सर्व गटशिक्षण अधिकाऱ्यांना सांगून पुन्हा एकदा अनधिकृत शाळा शोधण्यात येतील.
>
> **- संतोष पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, पुणे.**

> पुण्याच्या शिक्षण विभागाने बोगस शाळांची यादी जाहीर करून लोकांना सतर्कतेचा इशारा दिला आहे. बोगस शाळांना १ लाख रुपयांचा दंड आणि शाळा बंद न झाल्यास दररोज १० हजार रुपयांचा दंड केला जाणार आहे. मात्र या शाळा परवानगी नसताना कशा सुरू आहेत? त्यावर दंडात्मक कारवाई करून हा मुद्दा संपवण्यापेक्षा या बोगसगिरीवर घाव घालून पालकांची आणि विद्यार्थ्यांची फसवणूक टाळायला हवी.
>
> **- आनंद रणधीर, पालक-प्रतिनिधी तसेच शिक्षण कार्यकर्ते.**

# शहरात अजूनही अल्पवयीन मुलांच्या हाती गाड्या

## कल्याणीनगर अपघातातून बोध नाहीच; 11 अल्पवयीन मुलांना दंड

**पुणे | प्रतिनिधी**

कल्याणीनगरमध्ये अल्पवयीन मुलाने मद्यधुंद अवस्थेत पोर्शे कार चालवून दोघांना उडविले होते. हा गंभीर प्रकार ताजा असताना अपघातानंतर पालकांनी काही धडा घेतला का नाही, असा प्रश्न उपस्थित होऊ लागला आहे.

वाहतूक पोलिसांनी घेतलेल्या विशेष मोहिमेत ११ अल्पवयीन मुले वाहन चालविताना पोलिसांच्या हाती लागली. ते चालवत असलेल्या वाहनांवर पोलिसांनी दंडात्मक कारवाई केली आहे. दि. ९ जुलै रोजी वाहतूक पोलिसांच्या विशेष मोहिमेत अल्पवयीनमुले चालवीत असलेली वाहने आणि परवाने नसलेल्या वाहनांवर कारवाई करण्यात आली.

यामध्ये फरासखाना वाहतूक विभागाच्या हद्दीत ४ अल्पवयीन मुले, शिवाजीनगर वाहतूक विभागाच्या हद्दीत १, विमानतळ वाहतूक विभागाच्या हद्दीत २ हांडेवाडी वाहतूक विभागाच्या हद्दीत १, तर लोणी काळभोर वाहतूक विभागाच्या हद्दीत ३ अल्पवयीन मुले वाहने चालविताना पोलिसांनी त्यांना पकडून त्यांच्या वाहनांवर कारवाई केली.

विनापरवाना वाहन चालविणाऱ्यांची संख्या शहरात मोठ्या प्रमाणात असून, यामध्ये तब्बल ७३३ वाहनचालकांवर ही कारवाई केली आहे. सर्वाधिक कारवाई हडपसर १२३, येरवडा ५८, लोणीकंद ५३, कोरेगाव पार्क ५१, दत्तवाडी ४३, लोणी काळभोर, सहकारनगर प्रत्येकी ४१, वारजे माळवाडी ४० या ठिकाणी सर्वाधिक परवाना नसताना वाहनचालक वाहतूक पोलिसांना सापडले.



### मोटर वाहन कायदा काय सांगतो?

» मोटर वाहन कायद्यानुसार, अल्पवयीन,नाबालिक आरोपींसाठी या कायद्यात विविध कलमं आहेत. त्यानुसार, या प्रकारच्या प्रकरणात पालक अथवा वाहन मालकाला दोषी मानायला हवे. अशा प्रकरणात आरोपींन 3 वर्षांपर्यंतचा तुरुंगवास आणि 25,000 रुपयांच्या दंडची तरतूद आहे. लहान मुलांनी केलेल्या अपघातांची मालिका वाढल्यानंतर नवीन वाहन कायद्यात ही तरतूद करण्यात आली. जर आई-वडील, पालक वा वाहन मालक, हे जर हे सिद्ध करु शकले की, त्यांना संबंधित अपघाताची कुठलीच माहिती नव्हती. या घटनेबाबत, अपघाताविषयी काहीच माहिती नव्हती तर त्यांच्याविरोधात प्रकरण चालू शकत नाही. पण हे सिद्ध करण्यास परिस्थिती अथवा पुरावे कमी पडल्यास न्यायपालिका, अल्पवयीन मुलाच्या हाती वाहन दिल्याप्रकरणात पालक अथवा वाहन मालकाला दोषी ठरवू शकते.

### तरीही पालकांकडून हलगर्जीपणा ...

» एकीकडे कल्याणीनगर अपघाताचे प्रकरण ताजे आहे. एका अल्पवयीन मुलाच्या वाहन चालविल्यामुळे तीन पिढ्यांना कारागृहाची हवा खावी लागली. तसेच, कायद्यात अल्पवयीन मुलाने अपघात केल्यावर त्याच्या पालकाला जबाबदार धरले जाते. तोच प्रकार या कल्याणीनगर अपघातात पाहयला मिळाला. अशी परिस्थिती समोर असतानादेखील काही पालकांकडून कोणत्याही प्रकारे खबरदारी घेतली जात नसल्याने असे पालक आपल्या पाल्याबाबत हलगर्जीपणाच दाखवत असल्याचे यामुळे निदर्शनास आले आहे. एका दिवसातील अकरा अल्पवयीन मुले वाहने चालवत असल्याचा हा आकडा आहे. रोज शेकडो अल्पवयीन मुले वाहने चालवत आहेत.

# पेपर विक्रेता ते विधान परिषद आमदार

## आमदार अमित गोरखे यांचा खडतर प्रवास : शहरात भाजपाच्या निष्ठावंत चेहऱ्याला पुन्हा एकदा संधी

**पिंपरी | प्रतिनिधी**

एसटी स्थानकावर काकडी विकणे, घरोघरी जाऊन पेपर टाकणे अशी पडेल ती कामे करून श्रमाला प्रतिष्ठा प्राप्त करून देणारे अमित गोरखे आता विधान परिषदेत आमदार झाले आहेत. राजकारणाबरोबरच समाजकारण, सांस्कृतिक क्षेत्रातही त्यांनी घेतलेली भरारी लक्षवेधी आहे. अविश्रांत श्रम करून, इच्छित ध्येय साध्य करण्याची महत्त्वाकांक्षा असेल तर यशाचे उत्तुंग शिखर गाठता येते, हे त्यांनी कृतीतून दाखवून दिले आहे.



एका सर्वसामान्य गरीब कुटुंबामध्ये ४ नोव्हेंबर १९८० रोजी मुंढवा येथे अमित गोरखे यांचा जन्म झाला. आई अनुराधा आणि वडील गणपत गोरखे हे नगर जिल्ह्यातील लोणी व्यंकनाथ या गावचे. गणपत गोरखे हे मुंढव्यातील भारत फोर्जमध्ये सुरक्षारक्षकाचे काम करीत होते. अमोल आणि अश्विनी हे दोघे अमित गोरखे यांची भावंड. १९८२ मध्ये गणपत गोरखे यांनी भारत फोर्जमधील नोकरी सोडून चिंचवडच्या रस्टन ग्रीव्हज कंपनीत वॉचमन म्हणून रुजू झाले. चिंचवडला ते एका पत्र्याच्या घरात स्थायिक झाले.

चिंचवड येथील महापालिकेच्या काळभोरनगरच्या स्वामी विवेकानंद विद्या मंदिर या शाळेत अमित गोरखे यांचे चौथीपर्यंत प्राथमिक शिक्षण झाले, आणि पाचवी ते दहावी पर्यंतचे शिक्षण पिंपरी चिंचवड महापालिकेच्या माध्यमिक विद्यालयात झाले. त्यानंतर त्यांनी एमए व एमबीए केले. या शैक्षणिक प्रवासात त्यांना अनेक अडचणी आल्या. त्यावर मात करीत त्यांनी कच्ची दाबेली विकणे, घरोघरी वृत्तपत्र टाकणे, एसटी स्थानकावर काकडी विकण्याचेही काम त्यांनी केले. दरम्यान, २००३ मध्ये चिंचवड येथे दोन गाळे भाड्याने घेऊन, संगणकाचे क्लासेस सुरू केले. महिलांसाठी मोफत संगणक प्रशिक्षणही दिले. काळभोरनगर, चिंचवड येथील राष्ट्रतेज मंडळाच्या माध्यमातून जिवंत देखाव्याची संकल्पना त्यांनी लोकप्रिय केली होती. तेथेच कलारंग या सांस्कृतिक संस्थेची निर्मिती झाली. शहरातील स्थानिक कलाकारांना व्यासपीठ देण्याचे काम कलारंग संस्थेने त्यावेळेपासून चालू केले. कलारंगच्या माध्यमातून आजपर्यंत २०० हून अधिक प्रतिष्ठित कलाकारांना 'कलागौरव' पुरस्काराने गौरविले आहे.

नोव्हेल इन्स्टिट्यूट ऑफ बिझनेस मॅनेजमेंट अँड रिसर्च या शैक्षणिक ट्रस्टची स्थापना त्यांनी २००२ मध्ये केली. त्यांच्या संस्थेतून केजी ते पीजीपर्यंत हजारो विद्यार्थी शिक्षण पूर्ण करून बाहेर पडले आहेत. मागासवर्गीय समाजासाठी कार्य, गृहिणींना संगणक प्रशिक्षण व सांस्कृतिक कार्य यासाठी त्यांना २०१२ मध्ये केंद्र सरकारचा राष्ट्रीय युवा पुरस्कार मिळाला. तत्कालीन राष्ट्रपती प्रतिभा पाटील यांच्या हस्ते त्यांना तो प्रदान करण्यात आला.

अमित गोरखे यांनी लहानपणापासून राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे स्वयंसेवक म्हणून काम करण्यास सुरवात केली. संस्कार भारती या संस्थेचे प्रमुख म्हणूनही त्यांनी जबाबदारी पेलली आहे. भाजपचे प्रदेश सदस्य ते प्रदेश सचिव असा प्रवासही त्यांनी केला. साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे महामंडळावर अध्यक्ष म्हणूनही त्यांनी काम केले आहे. २०१२ मध्ये साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे यांच्या जन्मशताब्दीनिमित्त टपाल तिकिटाचे प्रकाशन आणि बोधचिन्हाचे अनावरण मुंबई येथे तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आले. 'एमजीडी' या संस्थेच्या माध्यमातून मॉस्को शहरातील शासकीय वाचनालयात फडणवीस यांच्या हस्ते अण्णाभाऊ साठे यांच्या अर्धपुतळ्याचे लोकार्पण करण्यात आले. भारतीय जनसंघाचे संस्थापक डॉ. शामाप्रसाद मुखर्जी, माजी पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी, स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे, यशवंतराव चव्हाण हे त्यांचे राजकीय क्षेत्रातील आदर्श आहेत. देवेंद्र फडणवीस यांना ते गुरुस्थानी मानतात.

### शहराला खरा न्याय भाजपनेच दिला..

» पिंपरी चिंचवड शहराच्या निर्मितीला ५० वर्षे झाली. काँग्रेस आणि राष्ट्रवादीने इथे ४० वर्षे राज्य केले, पण एकाही कार्यकर्त्याला कधी विधानपरिषद किंवा राज्यसभा वाट्याला आली नाही. भाजपने मात्र ती कसर भरून काढली. शिरूर, मावळ असे दोन लोकसभा खासदार शहराला होते, पण साबळेंच्या निमित्ताने तिसरा खासदार दिला होता. श्रीमती खापरेंमुळे विधान परिषद शहरात आली. राज्यमंत्रीपदाचा दर्जा असलेली तीन-तीन पदे शहरात आली. आता अमित गोरखेंना परिषदेवर संधी देऊन फक्त भाजपचेच चार आमदार शहरात झाले. आगामी विधासभा आणि महापालिका निवडणुकित त्याचा फायदा होईल.

# शिष्यवृत्ती परीक्षेत महापालिकेच्या विद्यार्थ्यांचे घवघवीत यश

## पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या शाळांतील 16 विद्यार्थ्यांनी जिल्हा स्तरावर मिळवले मानांकन

**पिंपरी | प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांच्यामार्फत घेण्यात आलेल्या इयत्ता ५ वी व ८ वी शिष्यवृत्ती परीक्षेत पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या शाळांतील १६ विद्यार्थ्यांनी जिल्हा स्तरावर मानांकन मिळविले असून ही बाब अभिमानास्पद आहे, असे मत आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी व्यक्त केले.

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांच्यामार्फत घेण्यात आलेल्या इयत्ता ५ वी व ८ वी शिष्यवृत्ती परिक्षेचा निकाल जाहिर झाला आहे. यामध्ये १३२ विद्यार्थी पुणे जिल्ह्याच्या गुणवत्ता यादीत आले आहेत. त्यापैकी १६ विद्यार्थी हे पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या शाळांतील आहेत. उर्दू शाळा आकुर्डी, उर्दू शाळा रुपीनगर, उर्दू शाळा थेरगाव, उर्दू शाळा खराळवाडी, उर्दू शाळा चिंचवड, उर्दू शाळा जाधववाडी, उर्दू शाळा लांडेवाडी, मुलांची शाळा मोशी, उर्दू शाळा दापोडी, उर्दू शाळा नेहरूनगर, मुलींची शाळा दिघी, अण्णासाहेब मगर माध्यमिक शाळा पिंपळे सौदागर या महापालिकेतील शाळांतील विद्यार्थी शिष्यवृत्ती परीक्षेत जिल्हा स्तरावर गुणवत्ता यादीत आले आहेत.

गुणवत्ता यादीमध्ये आलेल्या इयत्ता ५ वी आणि ८ वी तील विद्यार्थ्यांना महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या प्रमाणपत्रासह १० महिन्यांसाठी अनुक्रमे ५०० रुपये प्रती महिना आणि ७५० रुपये प्राप्त होणार आहे.




गेल्या दोन शैक्षणिक वर्षांच्या शिष्यवृत्ती परीक्षेत जिल्हास्तरीय क्रमवारी प्राप्त केलेल्या १९ सार्वजनिक शाळांतील विद्यार्थ्यांसाठी पिंपरी चिंचवड महानगपालिकेच्या वतीने भारत दर्शन अभ्यास दौरा आयोजित केला होता. हे विद्यार्थी गेल्या वर्षी १९ ते २५ नोव्हेंबर या कालावधीत बंगलोर, म्हैसूर, उटी आणि कोईम्बतूर या शहरांचा समावेश असलेल्या दक्षिण भारताच्या प्रवासाला गेले होते. त्यांच्यासोबत सात शिक्षक होते ज्यांनी त्यांच्या शिष्यवृत्ती परीक्षेच्या तयारीत त्यांना मार्गदर्शन करण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली होती. इस्रो (भारतीय अंतराळ संशोधन संस्था) तसेच भारतीय विज्ञान संस्थेतील वैज्ञानिकांशी संवाद साधण्याची तसेच प्रसिद्ध शैक्षणिक संस्थांचे अन्वेषण करण्याची अनोखी संधी देखील विद्यार्थ्यांना मिळाली आहे. गतवर्षीप्रमाणेच या वर्षी देखील जिल्हा गुणवत्ता यादीमध्ये आलेल्या विद्यार्थ्यांसाठी सहलीचे नियोजन करण्यात आले आहे.

> या शिष्यवृत्ती परीक्षांमधील आमच्या विद्यार्थ्यांचे यश हे पिंपरी चिंचवड महापालिकेच्या शाळांमध्ये दिल्या जाणाऱ्या शिक्षणाची गुणवत्ता अधोरेखित करते. जास्तीत जास्त उत्कृष्ट कामगिरी करण्यासाठी आमच्या विद्यार्थ्यांना सर्व आवश्यक संसाधने उपलब्ध करून देण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत.
>
> - प्रदिप जांभळे पाटील, अतिरिक्त आयुक्त.

> शैक्षणिक दर्जा सुधारण्यासाठी आमचे सततचे प्रयत्न या उत्कृष्ट निकालांवरून दिसून येतात. शिष्यवृत्ती निधी हे विद्यार्थ्यांना त्यांच्या शैक्षणिक प्रवासात खूप मदत करेल.
>
> - विजयकुमार थोरात, सहाय्यक आयुक्त.

# पूजा खेडकरांच्या अडचणीत आणखी वाढ!

## नॉन क्रिमिनल आणि मेडिकल दृष्टी दोष चाचणी कोणी केली : अधिकाऱ्यांवरही कारवाईची टांगती तलवार

**पुणे | प्रतिनिधी**

कोट्यवधींच्या संपत्तीने चर्चेत आलेल्या वादग्रस्त आयएएस प्रोबेशनर डॉ. पूजा खेडकर यांची सध्या सर्वत्र चांगलीच चर्चा रंगलेली असतानाच त्यांच्या अडचणीत सातत्याने वाढ होताना दिसत आहे. केवळ पूजा खेडकरच नव्हे तर त्यांच्या कुटुंबीयांचे देखील अनेक कारनामे आणि अरेरावी संदर्भातील प्रकार समोर आलं आहे. खासगी गाडीवर लाल दिव्यापासून ते जिल्हाधिकाऱ्यांच्या अँटी चेंबर कब्जापर्यंत आणि जिल्हाधिकाऱ्यांपेक्षा जास्त रुबाब करणाऱ्या प्रोबेशनरी IAS अधिकारी पूजा खेडकर यांचे नवनवे कारनामे समोर येत आहेत. त्यांच्या या कारनाम्यांची चर्चा सध्या पुण्यातील गल्ल्यांपासून देश पातळीवर होत आहे.



अशातच पूजा खेडकर प्रकरणी आता एक सदस्य समिती स्थापन करण्यात आली आहे. जर या समितीच्या तपासात खेडकर दोषी आढळून आल्या तर पूजा खेडकर यांची गच्छंती अटळ असल्याची माहिती केंद्र सरकारच्या सूत्रांनी दिली आहे.

अशातच आता पूजा खेडकर प्रकरणी सादर केलेले दस्तावेजांची तपासणी या समिती मार्फत केली जाणार आहे.

पूजा खेडकर यांनी सादर केलेल्या कागदपत्रात नॉनक्रिमिलेअर आणि मेडिकल दृष्टी दोष रिपोर्टची चाचणी प्रमाणपत्र कुणी दिलं? ज्या रहवासी भागातून हे प्रमाणपत्र देण्यात आली त्यांची देखील या प्रकणी चौकशी होऊन त्यावरही कारवाई होण्याची शक्यता आहे. याबाबत सोमवारी किंवा त्यानंतर चौकशी होऊन या बाबत कारवाई केली जाणार असल्याची प्राथमिक माहिती आहे.

वादग्रस्त आयएएस अधिकारी पूजा खेडकर यांच्या अडचणीत आता पुन्हा नव्याने वाढ होणार असल्याची शक्यता आहे. पूजा खेडकर प्रकरणातील सादर केलेल्या कागदपत्रांची तपासणी आता तपास समितीमार्फत होणार आहे. नॉन क्रिमिनल आणि मेडिकल दृष्टी दोष चाचणी कोणी केली होती, ज्या रहिवासी भागातून जे प्रमाणपत्र देण्यात आलं त्याची चौकशी करून संबंधितांवर कारवाई केली जाण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. सोमवार किंवा त्यानंतर या प्रकरणात कारवाई केली जाऊ शकते.

### दोषी आढळल्यास संबंधितांवर कारवाई

» पूजा खेडकर प्रकरणाची चौकशी करण्यासाठी चौकशी सदस्य समिती नेमली असून त्या प्रकरणाची सखोल चौकशी ही समिती सध्या करत आहेत. पूजा खेडकर यांनी सादर केलेले प्रमाणपत्र आणि कागदपत्रांची तपासणी ज्यामध्ये मेडिकल दृष्टीदोष चाचणी रिपोर्ट आणि नॉन क्रिमिनल इत्यादी कागदपत्रे ज्या भागातून देण्यात आले आहे त्या त्या संबंधित विभागाची चौकशी केली जाणार आहे. मात्र आज शनिवार आणि उद्या रविवार आल्याने ही कारवाई सोमवार किंवा मंगळवारी केली जाणार असल्याची प्राथमिक माहिती पुढे आली आहे. या कारवाईत काही दोष आढळल्यास संबंधितांवर कारवाई देखील केली जाणार आहे. त्यामुळे पूजा खेडकर प्रकरणात सातत्याने वाढ होताना दिसत आहे.

# ‘इन्फ्रास्ट्रक्चर’साठी महापालिकेला हवेत 738 कोटी!

## शहर, समाविष्ट गावांमधील पायाभूत सुविधांसाठी महापालिकेने पाठवला राज्य सरकारला प्रस्ताव

**पुणे | प्रतिनिधी**

शहरासह महापालिकेत नव्याने समाविष्ट झालेल्या गावांमध्ये पायाभूत सुविधा (इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंट) देण्यास महापालिकेला अपयश आले आहे. नागरी समस्यांनी नागरिक त्रासले आहेत. त्यामुळे आता महापालिकेने या पायाभूत सुविधांसाठी राज्य सरकाकडे तब्बल ७३८ कोटी निधीच्या मागणीचा प्रस्ताव पाठविला आहे. विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर या प्रस्तावाला राज्य सरकारकडून मान्यता दिली जाईल, अशी अपेक्षा आहे.



शहराचा मध्यवर्ती भाग दाट लोकवस्तीचा आहे. तसेच उपनगरात झपाट्याने विकास होत असून मोठ्या इमारती उभारल्या जात आहेत. गेल्या काही वर्षांत लोकसंख्या मोठ्या प्रमाणात वाढली आहे. त्यामुळे पायाभूत सुविधांवर ताण वाढला आहे. त्यामुळे नागरिकांची महापालिकेसह राज्य सरकारवर नाराजी आहे. महापालिकेने नागरिकांना चांगल्या पायाभूत सुविधा देण्यासाठी ७३८ कोटींचा प्रस्ताव तयार केला आहे. यामध्ये सर्वाधिक निधी भूसंपादनासाठी मागण्यात आला आहे.

शहरातील वाहतूककोंडी सोडवण्याच्या दृष्टीने महत्त्वाच्या रस्त्यांवरील मिसिंग लिंक जोडण्यासाठी महापालिकेला राज्य सरकारची मदत मिळणार आहे. उपमुख्यमंत्री, पालकमंत्री अजित पवार यांच्या सूचनेनुसार महापालिकेच्या पथ विभागाने पाच मिसिंग लिंक जोडण्यासाठी लागणाऱ्या १०० कोटींच्या निधीचा प्रस्ताव राज्याच्या वित्त विभागाला नुकताच पाठवला आहे.

विकास आराखड्यात (डीपी) दाखवलेल्या रस्त्याची संपूर्ण जागा ताब्यात आली तरच त्या रस्त्याचा पूर्ण वापर करता येतो. अन्यथा लाखो रुपये खर्च करून तयार केलेला रस्ता वापराविना पडून राहतो. पुण्यात डीपीमध्ये समावेश असलेले अनेक रस्ते भूसंपादन आणि इतर कारणांमुळे रखडलेले आहेत. महापालिका हद्दीत ५२० कि. मी. लांबीचे रस्ते तुकड्या-तुकड्यामध्ये तीनशे ठिकाणी रखडले आहेत. यामध्ये ० ते १०० मी, १०० ते ५०० मी, ५०० ते १००० मी. आणि त्या पुढे अशा रस्त्यांचा यामध्ये समावेश आहे.

पुणे विमानतळाचा विस्तार करण्यात येत आहे. या ठिकाणी असलेले रस्ते सध्या अरुंद आहेत. त्यामुळे या ठिकाणी १० रस्त्यांची कामे महापालिका हाती घेणार आहे. महापालिकेला रस्त्याच्या भूसंपादनासाठी अधिक निधी लागतो. भूसंपादनासाठी ४१४ कोटी रुपयांचा निधी लागणार आहे. महापालिकेने यासाठी प्रस्ताव तयार केला होता. वित्त आणि नियोजन विभागाकडे हा प्रस्ताव पाठवण्यात आला होता. प्रस्तावामध्ये काही त्रुटी शासनाकडून काढण्यात आल्या आहेत. महापालिका त्रुटींची पूर्तता करून हा प्रस्ताव पुन्हा पावणार असल्याचे पथ विभागाचे प्रमुख अनिरुद्ध पावसकर यांनी सांगितले.